मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 01 सप्टेंबर 2025 | पान - 1

# गणेशोत्सवापूर्वी आयुक्तांचा दणका!

## रस्ते, स्वच्छता अन् सुरक्षेसह अनधिकृत बांधकामांवर आयुक्तांचा वॉच

» पिंपरी | प्रतिनिधी

**गणेशोत्सवाच्या अनुषंगाने विद्युत तारा व जोडण्यांची सुरक्षितता तपासून धोकादायक जोडण्यांवर संबंधित यंत्रणांच्या समन्वयाने कार्यवाही करावी. कृत्रिम विसर्जन हौदांची तयारी, स्वच्छता, प्रकाश व्यवस्था आणि सुरक्षा व्यवस्था वेळेत पूर्ण करावी. तसेच प्रत्येक क्षेत्रीय अधिकाऱ्याने आपला प्रभाग स्वच्छ, सुंदर आणि नागरिकांसाठी सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडावी. पदपथ पादचाऱ्यांसाठी मोकळे करावेत, सार्वजनिक स्वच्छतागृहांची नियमित स्वच्छता, झाडांची छाटणी आणि रस्त्यांची दुरुस्ती वेळेत पूर्ण करावी. बीट निरीक्षकांमार्फत अनधिकृत बांधकामांवर बारकाईने लक्ष ठेवून तातडीने निष्कासनाची कार्यवाही करावी, अशा सूचना महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिल्या.**



"गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुरळीत सुविधा मिळणे ही महापालिकेची प्राथमिकता आहे. अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे आणि धोकादायक विद्युत जोडण्यांवर तातडीने कारवाई करावी. रस्ते, पदपथ, स्वच्छता आणि विसर्जन व्यवस्थेची कामे वेळेत पूर्ण करून नागरिकांची कोणतीही गैरसोय होणार नाही, याची दक्षता घ्यावी."

-डॉ. विजय सूर्यवंशी,
आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात आगामी गणेशोत्सव तसेच शहरातील विविध नागरी सुविधांच्या अनुषंगाने विभागप्रमुख व अधिकाऱ्यांची आढावा बैठक आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी घेतली. यावेळी शहरातील अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे, स्वच्छता व्यवस्था, रस्ते व पदपथांची स्थिती, विद्युत सुरक्षा, उद्याने, गणेशमूर्ती विसर्जनासाठी कृत्रिम विसर्जन हौदांची तयारी तसेच नागरिकांच्या तक्रारींच्या निपटाऱ्याचा आढावा घेण्यात आला.

गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांना सुरक्षित आणि सुरळीत सुविधा मिळाव्यात, यासाठी विविध विभागांनी परस्पर समन्वयाने काम करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. गणेशमूर्ती विसर्जनासाठी शहरातील कृत्रिम विसर्जन हौदांची आवश्यक तयारी वेळेत पूर्ण करून विसर्जनस्थळी स्वच्छता, प्रकाश व्यवस्था, सुरक्षा तसेच नागरिकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले.

### आयुक्तांचे अधिकाऱ्यांना थेट निर्देश

- गणेशोत्सवापूर्वी कृत्रिम विसर्जन हौदांची तयारी पूर्ण करा
- विसर्जनस्थळी स्वच्छता, प्रकाश आणि सुरक्षा व्यवस्था सक्षम करा
- धोकादायक व अनधिकृत विद्युत जोडण्यांवर तातडीने कारवाई करा
- शहरातील रस्ते खड्डेमुक्त करण्यास प्राधान्य द्या
- फुटपाथवरील अतिक्रमणे हटवून पादचाऱ्यांसाठी मोकळे करा
- अनधिकृत बांधकामांवर बीट निरीक्षकांनी बारकाईने लक्ष ठेवावे
- अनधिकृत बांधकामांची नळ व वीजजोडणी खंडित करण्याची कार्यवाही करा
- नागरिकांच्या तक्रारींचा वेळेत निपटारा करा
- लोकप्रतिनिधींच्या पत्रांना व तक्रारींना वेळेत प्रतिसाद द्या
- वाचनालये, ग्रंथालये आणि व्यायामशाळांची संख्या वाढवा

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, तृप्ती सांडभोर, सह आयुक्त मनोज लोणकर, शहर अभियंता मनोज सेठिया, सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, प्रेरणा सिनकर, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, उपआयुक्त सचिन पवार, सीताराम बहुरे, राजेश आगळे, डॉ. प्रदीप ठेंगल, अण्णा बोदडे, व्यंकटेश दुर्वास, संदीप खोत, पंकज पाटील, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, सहाय्यक आयुक्त अमित पंडित, तानाजी नरळे, क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, अश्विनी गायकवाड, निवेदिता घार्गे, अजिंक्य येळे, पूजा दूधनाळे, परशुराम वाघमोडे, गोरक्षनाथ लिम्हण, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड यांच्यासह स्थापत्य, विद्युत, पर्यावरण आदी विभागांचे कार्यकारी अभियंता आणि कर्मचारी उपस्थित होते.

## रोहित्रावर झाड कोसळलं अन् भडका उडाला! संभाजीनगरचा वीजपुरवठा ठप्प

» पिंपरी | प्रतिनिधी

**संभाजीनगर परिसरातील चिंतामणी सोसायटीमध्ये रविवारी (दि. ३०) दुपारी विद्युत रोहित्रावर झाड कोसळल्याने आग लागली. या घटनेमुळे परिसरातील वीजपुरवठा काही काळासाठी खंडित झाला. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.**



घटनेची माहिती मिळताच महावितरणचे अधिकारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या मदतीने रोहित्रावर कोसळलेल्या झाडाच्या फांद्या हटविण्याचे काम करण्यात आले. त्यानंतर वीज यंत्रणेची दुरुस्ती करून वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी दुपारपासून सायंकाळपर्यंत प्रयत्न सुरू होते.

पावसाळ्यात शहरात झाडे आणि फांद्या कोसळण्याच्या घटना वाढत असताना धोकादायक वृक्षांची वेळेत छाटणी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. सुट्टीच्या दिवशी दीर्घकाळ वीजपुरवठा खंडित राहिल्याने परिसरातील रहिवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागले.

दरम्यान, उद्यान विभाग आणि महावितरणने वीजवाहिन्या व रोहित्रांच्या परिसरातील धोकादायक झाडांची पाहणी करून प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. पावसाळ्यापूर्वीच धोकादायक वृक्ष आणि त्यांच्या फांद्यांची छाटणी केली असती, तर अशा घटना टाळता आल्या असत्या, अशी प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# गणेशोत्सवाआधी भेसळीचा बाजार? मिठाई-मावा विक्रेत्यांवर FDAचा 'वॉच'

## खवा-मावा, मिठाई अन् प्रसादाची मागणी वाढली; पुढील आठवड्यापासून FDAची तपासणी तीव्र

» पिंपरी | प्रतिनिधी

**गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर आला असताना खवा, मावा, मिठाई तसेच प्रसादाच्या पदार्थांच्या गुणवत्तेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सणासुदीच्या काळात मिठाई व खाद्यपदार्थांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने भेसळयुक्त किंवा असुरक्षित पदार्थ बाजारात येण्याची शक्यता वाढते. त्यामुळे अन्न व औषध प्रशासनाकडून (FDA) वेळेत तपासणी आणि कारवाई होणार का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.**




गणेशोत्सव तोंडावर आला असतानाही विशेष तपासणी मोहीम सुरू झाल्याचे अद्याप स्पष्टपणे समोर आलेले नाही. त्यामुळे भेसळ रोखण्यासाठी नेमलेली पथके प्रत्यक्षात कितपत कार्यरत आहेत, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. मिठाई दुकाने, मावा-खवा विक्रेते, दूध डेअरी, प्रसाद तयार करणारे व्यवसाय तसेच घाऊक विक्रेत्यांची अचानक तपासणी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

तपासणीदरम्यान कच्चा माल, साठवणूक व्यवस्था, स्वच्छता, पाण्याची गुणवत्ता, पॅकिंग तसेच मिठाईवरील 'बेस्ट बिफोर' तारीख तपासावी. संशयास्पद किंवा भेसळयुक्त पदार्थांचे नमुने घेऊन ते प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावेत, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. नियमांनुसार अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी नमुने घेऊन त्यांचे विश्लेषण करावे आणि अहवालाच्या आधारे संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात येत आहे.

भेसळयुक्त अथवा असुरक्षित अन्न आढळल्यास संबंधित साठा जप्त करून विक्री थांबविणे, सुधारणा नोटीस देणे तसेच दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद आहे. गंभीर प्रकरणांमध्ये संबंधित व्यावसायिकाचा परवाना निलंबित किंवा रद्द करण्याची कारवाईही होऊ शकते. पुणे विभागातील काही खाद्य आस्थापनांचे परवाने गंभीर स्वच्छता त्रुटींमुळे काही दिवसांपूर्वी निलंबित करण्यात आले आहेत.

दरम्यान, मिठाई किती दिवसांपर्यंत खाण्यायोग्य आहे, याची तारीख ट्रेवर दर्शनी भागात लावणे, खवा-मावा यांसारखे पदार्थ नोंदणी किंवा परवानाधारक व्यावसायिकांकडूनच खरेदी करणे, पदार्थ तयार करताना पिण्याच्या पाण्याचा वापर करणे, खाद्यपदार्थांची स्वच्छ व सुरक्षित ठिकाणी साठवणूक करणे आणि जाळीदार झाकणांचा वापर करणे, अशा सूचना प्रशासनाकडून यापूर्वीच देण्यात आल्या आहेत. तसेच दुकानांमध्ये स्वच्छता राखण्यासह पॅकबंद व पार्सल सेवेसाठी कागदाचा वापर टाळण्याचेही निर्देश आहेत.

> "शहरातील संशयास्पद दुकाने, मिठाई विक्रेते आणि खाद्य आस्थापनांची तपासणी सुरू आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या आरोग्याची सुरक्षितता लक्षात घेऊन पुढील आठवड्यापासून ही तपासणी मोहीम आणखी तीव्र करण्यात येणार आहे. खवा, मावा, मिठाई तसेच इतर खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेची काटेकोर तपासणी केली जाईल. नियमांचे उल्लंघन किंवा भेसळ आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल. याबाबतचे परिपत्रकही लवकरच जारी करण्यात येईल."
>
> -दिगंबर भोगावडे, सहआयुक्त, अन्न व औषध प्रशासन

# "डीजेच्या वादात पडू नका"; पुणेकरांना मुख्यमंत्र्यांचा थेट सल्ला!

» पिंपरी | प्रतिनिधी

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दरवर्षी ऐरणीवर येणाऱ्या डीजे आणि ध्वनीप्रदूषणाच्या मुद्द्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणेकरांना स्पष्ट संदेश दिला आहे. पुण्यात आयोजित भाजपच्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत बोलताना त्यांनी डीजेच्या वादात न पडता गणेशोत्सव संपूर्ण सांस्कृतिक पद्धतीने साजरा करण्याचे आवाहन केले.**



पुण्याच्या गणेशोत्सवाला केवळ धार्मिक उत्सवाची परंपरा नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रबोधनाचीही मोठी परंपरा आहे. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला व्यापक स्वरूप देताना समाजाला एकत्र आणणे, जनजागृती करणे आणि सामाजिक एकोपा वाढवणे हा उद्देश ठेवला होता. त्यामुळे पुण्याच्या गणेशोत्सवाकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष असते. याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणेकरांना डीजेच्या आवाजावरून निर्माण होणाऱ्या वादापासून दूर राहून उत्सवाची सांस्कृतिक ओळख जपण्याचे आवाहन केले आहे.

पुण्यात गणेशोत्सवात डीजे वाजवला पाहिजे की नाही, यावर दरवर्षी चर्चा आणि वाद निर्माण होतात. ध्वनीप्रदूषण, मोठ्या आवाजातील स्पीकर्स, मिरवणुकांमधील कर्णकर्कश संगीत आणि त्याचा नागरिकांना होणारा त्रास यावरून गणेश मंडळे, नागरिक आणि प्रशासन यांच्यात मतभेद पाहायला मिळतात. मात्र, या वादापेक्षा पुण्याने आपल्या गणेशोत्सवाची वेगळी आणि सांस्कृतिक ओळख संपूर्ण महाराष्ट्रासमोर ठेवावी, अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

"पुण्यातच ती क्षमता आहे जी संपूर्ण सांस्कृतिक पद्धतीने उत्सव साजरा करू शकते. हे केवळ पुणेकरच करू शकतात. त्यामुळे या वादात न पडता सांस्कृतिक पद्धतीने गणेशोत्सव कसा साजरा केला जातो, हे पुणेकरांनी संपूर्ण महाराष्ट्राला दाखवून द्यावे," असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले. त्यांच्या या वक्तव्यामुळे गणेशोत्सवातील डीजेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

मुख्यमंत्र्यांच्या या आवाहनाचा रोख केवळ डीजे बंद करण्यापुरता मर्यादित नसून, गणेशोत्सवाच्या मूळ परंपरेचे जतन करण्याकडे असल्याचे मानले जात आहे. पुण्यातील गणेश मंडळांनी देखावे, सामाजिक संदेश, प्रबोधनपर कार्यक्रम, पारंपरिक वाद्ये, सांस्कृतिक कार्यक्रम आणि समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून उत्सवाची परंपरा पुढे न्यावी, अशी अपेक्षा या भूमिकेतून व्यक्त होत आहे.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन!

> "डीजेच्या वादात पडू नका; गणेशोत्सवाची सांस्कृतिक आणि पारंपरिक ओळख जपा. पुणेकरांनी शिस्तबद्ध व सांस्कृतिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करून संपूर्ण महाराष्ट्रासमोर आदर्श निर्माण करावा."

दरम्यान, पुण्यात गणेशोत्सव आणि दहीहंडीच्या काळात डीजे तसेच मोठ्या आवाजातील स्पीकर्सच्या वापराला नागरिकांकडून विरोध वाढत आहे. विशेषतः रात्री उशिरापर्यंत सुरू राहणाऱ्या कर्णकर्कश आवाजामुळे ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, लहान मुले आणि गर्भवती महिलांना होणाऱ्या त्रासाचा मुद्दा सातत्याने उपस्थित केला जात आहे. ध्वनीप्रदूषणामुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत असल्याने प्रशासनानेही नियमांचे पालन करण्याबाबत वेळोवेळी सूचना दिल्या आहेत.

याच मुद्द्यावर पुण्यात विद्यानंद बापट यांनी डीजेविरोधातील भूमिका आक्रमक केली आहे. डीजेच्या वाढत्या वापरामुळे गणेशोत्सवातील पारंपरिक वाद्ये आणि सांस्कृतिक कार्यक्रम मागे पडत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे यंदाच्या उत्सवात डीजेचा वापर, ध्वनीप्रदूषण आणि पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याचा मुद्दा अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

भाजप खासदार मेधा कुलकर्णी यांनीही डीजेच्या अनिर्बंध वापरावर स्पष्ट शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे. धार्मिक उत्सवाच्या नावाखाली रस्त्यावर मोठ्या आवाजात धांगडधिंगा घातल्यानेच धार्मिकता सिद्ध होते, ही भूमिका मान्य नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. उत्सव साजरा करताना आजूबाजूच्या नागरिकांचाही विचार करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मोठ्या आवाजामुळे रुग्ण, गर्भवती महिला आणि लहान मुलांना मोठा त्रास सहन करावा लागतो.

# पुणे-पिंपरी बससेवा मंदावली; 5 मिनिटांची बस आता फक्त 21% नागरिकांना!

## शहर वाढले, बसताफा अपुरा; पुनर्नियोजनाने सेवा ६१% पर्यंत सुधारण्याची शक्यता

**» पुणे | प्रतिनिधी**

**पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील सार्वजनिक बससेवेच्या वारंवारतेचे वास्तव समोर आले असून, नागरिकांना दर पाच मिनिटांनी बस उपलब्ध होण्याचे प्रमाण तब्बल ६६ टक्क्यांवरून घसरून केवळ २१ टक्क्यांवर आले आहे. शहराचा झपाट्याने विस्तार होत असताना त्याप्रमाणात पीएमपीएमएलच्या बसताफ्यात वाढ न झाल्याने सार्वजनिक वाहतुकीवर मोठा ताण निर्माण झाल्याचे 'पीपल निअर ट्रान्झिट २०२६' (PNT) अहवालातून स्पष्ट झाले आहे.**




पीएमपीएमएल आणि आयटीडीपी इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने तयार करण्यात आलेल्या या अहवालातून पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील महत्त्वाच्या त्रुटींवर प्रकाश टाकण्यात आला आहे. या अहवालाचे नुकतेच महापौर मंजूषा नागपुरे, महापालिका आयुक्त नवलकिशोर राम, पीएमपी अध्यक्ष व व्यवस्थापक महेश आव्हाड तसेच पीएमपी संचालक आणि प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

२०१९ मध्ये पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील तब्बल ६६ टक्के नागरिकांना दर पाच मिनिटांनी बससेवा उपलब्ध होती. मात्र, आता हेच प्रमाण थेट २१ टक्क्यांवर आले आहे. गेल्या काही वर्षांत शहराची लोकसंख्या आणि विस्तार मोठ्या प्रमाणावर वाढला, मात्र त्या तुलनेत सार्वजनिक बससेवेचा विस्तार झालेला नसल्याने नागरिकांना नियमित आणि जलद बससेवेपासून वंचित राहावे लागत आहे.

शहरातील नवीन वसाहती, औद्योगिक परिसर, आयटी क्षेत्र आणि वाढती लोकसंख्या यामुळे प्रवाशांची संख्या सातत्याने वाढत आहे. मात्र, अनेक मार्गांवर बसची संख्या आणि वारंवारता कमी असल्याने नागरिकांना बससाठी १० ते २० मिनिटे किंवा त्यापेक्षा अधिक काळ प्रतीक्षा करावी लागत आहे. परिणामी वेळेची बचत करण्यासाठी अनेक नागरिक खासगी वाहनांचा वापर करत असून, त्याचा थेट परिणाम शहरातील वाहतूक कोंडी आणि प्रदूषणावर होत आहे.

आयटीडीपीचे उपव्यवस्थापक आदित्य राणे यांच्या मते, सध्या १० ते २० मिनिटांच्या अंतराने धावणाऱ्या बसमार्गांचे योग्य पद्धतीने पुनर्नियोजन केल्यास दर पाच मिनिटांनी बससेवा मिळणाऱ्या नागरिकांचे प्रमाण २१ टक्क्यांवरून थेट ६१ टक्क्यांपर्यंत वाढू शकते. त्यामुळे केवळ नवीन बस खरेदी करण्यावर भर न देता विद्यमान बस आणि मार्गांचा अधिक कार्यक्षम वापर करण्याची आवश्यकता असल्याचे अहवालातून स्पष्ट झाले आहे.

अहवालात पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील उच्च लोकसंख्या घनता असतानाही पुरेशी वारंवार बससेवा उपलब्ध नसलेले १६ भाग ओळखण्यात आले आहेत. पुण्यातील बाणेर, धानोरी, धावडे, हांडेवाडी, कोंढवा, कोथरूड, आंबेगाव आणि वडगाव शेरी या भागांचा त्यामध्ये समावेश आहे. तर पिंपरी-चिंचवडमधील आकुर्डी, भोसरी, चिखली, एमआयडीसी, रहाटणी, सांगवी, तळवडे आणि वाकड या भागांमध्ये बससेवेची वारंवारता वाढवण्याची गरज असल्याचे अभ्यासातून समोर आले आहे.

या भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या आणि रोजगाराची केंद्रे निर्माण झाली असतानाही त्याप्रमाणात सार्वजनिक वाहतुकीची सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांच्या अडचणी वाढल्या आहेत. विशेषतः कार्यालयीन वेळेत बसची गर्दी, बस मिळण्यासाठी लागणारा वेळ आणि काही मार्गांवरील अपुरी वारंवारता यामुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे.

# पुण्यात CNG दराचा भडका! किलोमागे २ रुपयांनी वाढ

**» पुणे | प्रतिनिधी**

**पुणेकरांच्या वाहनखर्चात पुन्हा एकदा वाढ झाली असून, महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड (MNGL)ने सीएनजीच्या दरात प्रतिकिलो दोन रुपयांची वाढ केली आहे. ही दरवाढ सोमवारी मध्यरात्रीपासून लागू होणार आहे. त्यामुळे पुणे शहरासह पिंपरी-चिंचवड, चाकण, तळेगाव आणि हिंजवडी परिसरातील वाहनचालकांना आता सीएनजीसाठी अधिक पैसे मोजावे लागणार आहेत. नव्या दरानुसार सीएनजीची किरकोळ विक्री किंमत ९७.७५ रुपये प्रतिकिलो झाली आहे. मात्र, घरगुती वापरासाठीच्या पाइप्ड नॅचरल गॅसच्या (PNG) दरांमध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही.**




पश्चिम आशियातील वाढता तणाव आणि त्याचा जागतिक ऊर्जा बाजारावर झालेला परिणाम हा सीएनजी दरवाढीमागील प्रमुख कारण असल्याचे एमएनजीएलने स्पष्ट केले आहे. 'स्ट्रेट ऑफ होर्मुझ' या महत्त्वाच्या सागरी मार्गावरून होणाऱ्या एलएनजी वाहतुकीत अडथळे निर्माण झाल्याने जागतिक बाजारपेठेत स्पॉट एलएनजीच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. जुलै २०२६ पासून पश्चिम आशियातील संकट अधिक तीव्र झाल्याने या मार्गावरील एलएनजी वाहतुकीवर गंभीर परिणाम झाला असून, संकटापूर्वीच्या तुलनेत जागतिक एलएनजीच्या किमती जवळपास दुप्पट झाल्याचा दावा कंपनीने केला आहे. या परिस्थितीचा थेट परिणाम भारतातील नैसर्गिक वायूच्या खरेदी खर्चावरही झाला आहे.

त्यातच आगामी हिवाळ्याच्या पार्श्वभूमीवर युरोपमध्ये नैसर्गिक वायूचा साठा वाढविण्याची प्रक्रिया सुरू असल्याने जागतिक एलएनजी बाजारपेठेवरील दबाव आणखी वाढला आहे. युरोपसह विविध देशांकडून वाढलेली मागणी आणि पुरवठ्यातील अडथळे यामुळे एलएनजीच्या किमतीत चढ-उतार कायम आहेत. परिणामी भारतासारख्या मोठ्या ऊर्जा बाजारपेठांनाही वाढलेल्या आयात खर्चाचा फटका बसत असून, त्याचा परिणाम सीएनजीच्या किंमतीवर होत आहे.

### CNG शंभरीच्या उंबरठ्यावर; वाहनचालकांचा खर्च वाढणार

एकीकडे पेट्रोल-डिझेलच्या तुलनेत स्वस्त पर्याय म्हणून सीएनजीकडे पाहिले जात असताना आता सीएनजीच्या दरानेही शंभरीच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. त्यामुळे रिक्षा, टॅक्सी तसेच खासगी सीएनजी वाहनधारकांच्या मासिक खर्चात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

देशाची अर्थव्यवस्था वेगाने वाढत असताना वाहनांसाठी सीएनजीच्या वापरातही सातत्याने वाढ होत आहे. पेट्रोल-डिझेलच्या तुलनेत तुलनेने किफायतशीर पर्याय म्हणून सीएनजीकडे मोठ्या प्रमाणात वाहनचालक वळत आहेत. त्यामुळे शहरांमध्ये सीएनजीची मागणी वाढली आहे. ही वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी सीएनजी क्षेत्राला आवश्यक असलेल्या नैसर्गिक वायूचा मोठा हिस्सा आयात केलेल्या स्पॉट एलएनजीमधून उपलब्ध केला जात आहे. जागतिक बाजारातील वाढलेल्या किमती आणि स्पॉट एलएनजीवरील वाढते अवलंबित्व यामुळे सीएनजीसाठी लागणाऱ्या इनपुट गॅसच्या खरेदी खर्चात मोठी वाढ झाली आहे.

एमएनजीएलच्या म्हणण्यानुसार, वाढलेल्या इनपुट गॅसच्या खर्चाचा संपूर्ण भार ग्राहकांवर न टाकता कंपनीने त्यातील मोठा हिस्सा स्वतः सोसला आहे. त्यामुळे वाढलेल्या खर्चाच्या तुलनेत ग्राहकांवर मर्यादित भार पडावा, यासाठी किरकोळ विक्री दरात प्रतिकिलो दोन रुपयांची वाढ करण्यात आली आहे. कंपनीने ही दरवाढ वाढलेल्या खर्चाचा केवळ काही भाग भरून काढण्यासाठी असल्याचे स्पष्ट केले आहे.

मात्र, आधीच पेट्रोल-डिझेल, वाहन देखभाल, विमा आणि दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या खर्चामुळे त्रस्त असलेल्या वाहनचालकांसाठी सीएनजीची दरवाढही डोकेदुखी ठरणार आहे. विशेषतः रिक्षा आणि टॅक्सी चालकांच्या रोजच्या इंधन खर्चात वाढ होणार असल्याने त्याचा परिणाम त्यांच्या उत्पन्नावर होण्याची शक्यता आहे.

# दिव्यांगांसाठी PMCचा मोठा पुढाकार; 50 ठिकाणी रॅम्प उभारणार

## ‘बिल्डिंग अ पर्पल पुणे’ उपक्रमाला सुरुवात; बजाज फिनसर्व्हच्या CSR निधीतून रॅम्पची उभारणी

**» पुणे | प्रतिनिधी**

**दिव्यांग व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक तसेच हालचालींमध्ये अडचणी असलेल्या नागरिकांना सार्वजनिक ठिकाणी सहज, सुरक्षित आणि सन्मानाने वावरता यावा, यासाठी पुणे महापालिकेने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. महापालिका आणि ‘रॅम्प माय सिटी’ यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला असून, या कराराच्या माध्यमातून शहरातील पहिल्या टप्प्यात ५० सार्वजनिक ठिकाणी व्हीलचेअर वापरणाऱ्यांसाठी रॅम्प उभारण्यात येणार आहेत. या उपक्रमासाठी बजाज फिनसर्व्हकडून सीएसआर निधीतून आर्थिक सहकार्य मिळणार आहे.**



महापालिका कार्यालये, सांस्कृतिक स्थळे, उद्याने, क्रीडांगणे तसेच इतर सार्वजनिक ठिकाणी प्रवेश करताना दिव्यांग नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अनेक ठिकाणी पायऱ्या, उंच प्रवेशद्वार, अरुंद मार्ग किंवा व्हीलचेअर सहज नेता येईल अशा सुविधा उपलब्ध नसल्याने दिव्यांग व्यक्तींना सार्वजनिक सुविधांचा वापर करताना इतरांच्या मदतीवर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे त्यांना स्वावलंबीपणे आणि सन्मानाने वावरण्यात अडथळे निर्माण होतात. ही परिस्थिती बदलण्यासाठी संबंधित सार्वजनिक ठिकाणांची पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी शास्त्रीय पद्धतीने रॅम्प उभारण्यात येणार आहेत. रॅम्पची उभारणी करताना व्हीलचेअरचा सहज वापर, सुरक्षितता आणि नागरिकांची सोय यांचा विशेष विचार केला जाणार आहे. यामुळे व्हीलचेअर वापरणाऱ्या व्यक्तींसह ज्येष्ठ नागरिक, जखमी व्यक्ती तसेच चालताना अडचणी येणाऱ्या नागरिकांनाही सार्वजनिक ठिकाणी अधिक सहज आणि सुरक्षितपणे प्रवेश करता येणार आहे.

‘बिल्डिंग अ पर्पल पुणे’ या संकल्पनेअंतर्गत हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. शहरातील सार्वजनिक ठिकाणे काही विशिष्ट नागरिकांसाठी मर्यादित न राहता प्रत्येक व्यक्तीला समान आणि सहज वापरता यावीत, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. पहिल्या टप्प्यात शहरातील ५० सार्वजनिक ठिकाणी रॅम्प उभारण्यात येणार असून, त्यानंतर या उपक्रमाचा विस्तार इतर भागांमध्ये करण्याचे नियोजन आहे. पुढील टप्प्यांत केवळ प्रवेशासाठी रॅम्प देण्याऐवजी दिव्यांग नागरिकांना येणाऱ्या इतर अडचणींचीही पाहणी केली जाणार आहे. त्यानुसार शौचालये, पार्किंग, मार्गिका, प्रवेशद्वारे आणि इतर आवश्यक सुविधांमध्ये सुधारणा करण्यावर भर दिला जाण्याची शक्यता आहे.

सार्वजनिक पायाभूत सुविधा विकसित करताना दिव्यांग नागरिकांच्या गरजांचा सुरुवातीपासूनच विचार होणे आवश्यक आहे, अशी भूमिका महापालिका प्रशासनाने घेतली आहे. शहरातील अनेक जुन्या सार्वजनिक इमारती आणि सुविधांमध्ये दिव्यांगांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सोयींचा अभाव आहे. त्यामुळे उपलब्ध पायाभूत सुविधांमध्ये आवश्यक ते बदल करून त्या अधिक सुलभ करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून केला जाणार आहे. केवळ रॅम्प उभारून हा उपक्रम थांबविण्याऐवजी भविष्यात सार्वजनिक ठिकाणांची रचना करताना ‘युनिव्हर्सल ॲक्सेस’ अर्थात सर्व नागरिकांना सहज वापरता येईल, या संकल्पनेला प्राधान्य देण्यावर भर दिला जाणार आहे.

या उपक्रमासाठी बजाज फिनसर्व्हकडून सीएसआर निधीतून सहकार्य मिळणार असल्याने महापालिकेवरील आर्थिक भारही कमी होणार आहे. महापालिका आणि ‘रॅम्प माय सिटी’ यांच्यात झालेल्या सामंजस्य करारामुळे या कामाला संस्थात्मक स्वरूप मिळाले आहे. संबंधित संस्थांच्या सहकार्याने सार्वजनिक ठिकाणांची निवड, पाहणी आणि आवश्यक सुविधांचे नियोजन केले जाणार आहे. त्यामुळे दिव्यांग नागरिकांना प्रत्यक्षात उपयोगी पडतील अशा सुविधा उभारण्यावर भर राहणार आहे.

महापौर मंजूषा नागपुरे यांनी प्रत्येक नागरिकाला सार्वजनिक ठिकाणी समान आणि सहज प्रवेश मिळणे हा त्यांचा अधिकार असल्याचे सांगितले. शहराच्या विकासात दिव्यांग नागरिकांच्या गरजांकडे दुर्लक्ष होता कामा नये, अशी भूमिका त्यांनी व्यक्त केली. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सार्वजनिक पायाभूत सुविधा विकसित करताना दिव्यांग नागरिकांच्या गरजांचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक असल्याचे नमूद केले. अतिरिक्त महापालिका आयुक्त पवनीत कौर यांनी ‘बिल्डिंग अ पर्पल पुणे’ हा अधिक समावेशक आणि संवेदनशील पुणे घडविण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल असल्याचे सांगितले.

या उपक्रमामुळे शहरातील सार्वजनिक ठिकाणांवरील प्रवेशव्यवस्था अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे. विशेषतः व्हीलचेअर वापरणाऱ्या नागरिकांना प्रत्येक ठिकाणी इतरांच्या मदतीची गरज भासू नये, यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे.

# कडूसमध्ये गोवंश कत्तलीचा गंभीर आरोप; ११ जणांना अटक

**» पुणे | प्रतिनिधी**

**तिसऱ्या श्रावणी सोमवारी आणि चतुर्थीच्या दिवशी कडूस (ता. खेड) येथील तुरुकवाडी परिसरात दोन गोवंशांची कत्तल केल्याचा धक्कादायक प्रकार सोमवारी (दि. ३१) पहाटे उघडकीस आला. या प्रकरणात माजी ग्रामपंचायत सदस्याच्या मुलासह एकूण ११ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या घटनेमुळे कडूस परिसरात मोठी खळबळ उडाली असून, नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.**




सोमवारी सकाळी बजरंग दल (कडूस-खेड), गोरक्षक विभाग आणि खेड पोलीस ठाणे यांच्या संयुक्त कारवाईत संबंधित आरोपींना ताब्यात घेण्यात आले. प्राथमिक माहितीनुसार, तुरुकवाडी परिसरात दोन गोवंशांची कत्तल केल्याचा प्रकार समोर आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करून आवश्यक पुरावे आणि संबंधित माहिती संकलित केली असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. अटक करण्यात आलेल्या प्रत्येक आरोपीची नेमकी भूमिका काय होती, तसेच या प्रकारामागील कारणे आणि इतर काही व्यक्तींचा सहभाग आहे का, याचा तपास पोलीस करत आहेत. तपासादरम्यान आणखी काही महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता आहे.

दरम्यान, या घटनेच्या निषेधार्थ कडूस गावात मंगळवारी (दि. १) कडकडीत बंद पाळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर गावातील व्यापारी, व्यावसायिक आणि नागरिकांनी बंदमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच सकाळी १० वाजता श्री भैरवनाथ महाराज मंदिर ते ग्रामपंचायत कार्यालय असा निषेध मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चामध्ये मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होण्याची शक्यता असून, घटनेचा निषेध नोंदवून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात येणार आहे.

कडूस परिसरात यापूर्वीही अशाच प्रकारची घटना घडल्याचा दावा करण्यात आला आहे. सुमारे तीन वर्षांपूर्वी आषाढी एकादशीच्या दिवशी कडूस गावातील रहदारीच्या ठिकाणी आणि भरवस्तीमध्ये गोवंश कत्तलीचा प्रकार समोर आला होता. त्यावेळीही या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. आता तब्बल तीन वर्षांनंतर पुन्हा कडूस-तुरुकवाडी परिसरात दोन गोवंशांची कत्तल केल्याचा प्रकार उघडकीस आल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. वारंवार अशा घटना घडत असल्याने संबंधित यंत्रणांनी या प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही स्थानिकांकडून केली जात आहे.

विशेष म्हणजे, श्रावणी सोमवार आणि चतुर्थीसारख्या धार्मिक दिवसाच्या पार्श्वभूमीवर हा प्रकार समोर आल्याने परिसरातील वातावरण अधिक संवेदनशील झाले आहे. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि गावातील शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलिसांकडून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.